जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ संघाचा 'इंद्रधनुष्य'साठी सराव

## नाशिकमध्ये डिसेंबरमध्ये रंगणार महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'इंद्रधनुष्य' या राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठ संघाचा सराव सुरू झाला आहे.

राज्यपालांच्या निर्देशनानुसार इंद्रधनुष्य युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिक येथे दि. ७ ते ११ डिसेंबर या कालावधीत यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात हा महोत्सव होणार आहे. नृत्य, नाट्य, संगीत, कला, वाङ्मय प्रकारात विद्यापीठाच्या ४० विद्यार्थी कलाकारांचा संघ सहभागी होणार आहे.

सोमवारपासून संघाचा सराव सुरू झाला आहे. विद्यापीठ परीक्षा सुरू



झाल्या असल्या तरी विद्यार्थी वेळ काढून महोत्सवाची तयारी करण्यात गुंतले आहेत. येत्या काही दिवसांत महोत्सवाची तयारी पूर्ण होईल व महोत्सवासाठी नोंदणी करण्यात येणार असल्याचे विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

सकाळ

# सायबर सिक्युरिटी ॲम्बॅसडर

## शिवाजी विद्यापीठात नॅशनल रिसर्च सेंटर; देशातील पहिलेच केंद्र

**संदीप खांडेकर** : सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठात देशातील पहिले नॅशनल रिसर्च सेंटर फॉर सायबर सिक्युरिटी डेटा सायन्सेस आकाराला येत आहे. त्यासाठी सात कोटी मंजूर झाले असून, 'सायबर सिक्युरिटी ॲम्बॅसडर' म्हणून विद्यापीठ कार्यरत असणार आहे. सायबरच्या वाढत्या गुन्ह्यांचा चढता आलेख पाहता सेंटर महत्त्वपूर्ण ठरेल.

मानव विकास संसाधन मंत्रालयाच्या पंडित मदन मोहन मालवीय स्किम फॉर टिचिंग ॲन्ड टीचर्स ट्रेनिंग अंतर्गत हे सेंटर विद्यापीठात स्थापन होत आहे. डिजिटल ट्रान्जेक्शनच्या अनुषंगाने सिक्युरिटीचे महत्त्व लोकांना कळावे, २०२१ पर्यंत दोन हजार टीचर्स प्रशिक्षित व्हावेत व सायबर सिक्युरिटी अंतर्गत विविध कोर्सेसची निर्मिती व्हावी, हा सेंटरच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. सेंटरसाठी स्वतंत्र इमारत बांधण्यात येणार आहे. त्यामध्ये अत्याधुनिक लॅब असणार असून तेथे ॲप कसे वापरायचे व एटीएम वापरताना कोणती काळजी घ्यायची, याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

गुन्हा घडू नये म्हणून काय करायचे, याबाबत सेंटर मार्गदर्शन करणार आहे. तसेच सायबर ऑडिटही केले जाणार असून सायबर सिक्युरिटी अंतर्गत आर्टिफिशिअल इंटेलिजन्स जनरेट केले जाईल. सायबर सेक्युरिटीचे जाळे तयार करण्यासाठी अमर ठाकरे, दिनेश कुडचे व रोहन न्यायाधीश कार्यरत असणार आहेत. सेंटरचे समन्वयक म्हणून डॉ. आर. के. कामत काम पाहणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कविता ओझा, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एस. ए. शिंदे, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. यू. आर. पोळ कार्यरत असणार आहेत.

> **केंद्र सरकारने विद्यापीठात सेंटरला मान्यता देऊन विद्यापीठाचा सन्मान केला आहे. विद्यापीठात तशी सक्षमता आहे, हे त्यातून स्पष्ट होते. राष्ट्रीय स्तरावरच्या सेंटरच्या माध्यमातून सायबर सिक्युरिटीबाबत जनजागृती केली जाईल. त्याचबरोबर शैक्षणिक संस्था, बँकांवर होणाऱ्या सायबर अटॅक्सना पायबंद घालण्यासाठी मदत होईल.**
> **- डॉ. डी. टी. शिर्के,** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

> **महाराष्ट्र पोलिस दलात दोन हजार सायबर एक्सपर्ट नियुक्त करायचे आहेत. त्यासाठी गृहमंत्र्यांच्या कार्यालयाशी चर्चा सुरू आहे. सायबर सिक्युरिटी सेंटरमधून प्रशिक्षित मनुष्यबळ त्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.**
> **- डॉ. आर. के. कामत**

# विद्यापीठात उद्यापासून महिला आरोग्य परिषद

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन व महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषद यांच्यावतीने सातव्या महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषद होणार आहे. १५ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनात ही परिषद होईल.

ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या-विचारवंत मनीषा गुप्ते यांच्या हस्ते परिषदेचे उदघाटन होणार आहे. ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी, डॉ. भारती पाटील, अॅड. पल्लवी रेणके, दिशापिंकी शेख, प्रा. डॉ. राजन गवस, मेधा काळे, रंजना कान्हेरे, मीना शेषू , मेघा पानसरे, मेधा थत्ते, सीमा कुलकर्णी, शाहीन शेख या मार्गदर्शनपर संवाद साधणार आहेत. परिषदेत बीडी कामगार, उसतोडणी कामगार, घरगुती कामगार, बांधकाम कामगार, कचरावेचक महिला, स्थलांतरित व भटक्या आदिवासी समूहातील स्त्रिया, दलित, वंचित, अल्पसंख्यांक समूहातील महिला, ट्रान्स जेन्डर, समलैंगिक समूह व वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, देवदासी महिला, एचआयव्हीग्रस्त व एचआयव्हीग्रस्त गर्भवती, माइक्रोफायनान्स योजनांनी शोषित स्त्रिया, एकल महिला, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकरी महिला, शेतमजूर व भूमिहीन महिला, परित्यक्ता, बेघर महिला, अंधश्रद्धांनी शोषित स्त्रिया अशा सर्व शोषित व वंचित घटकांतील प्रत्यक्ष हे जगणे अनुभवणाऱ्या महिला व सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते सहभागी होत आहेत.

यावेळी आरोग्य व विकासाच्या मुद्द्यांवर काम करणाऱ्या ३०० हून अधिक महिला कार्यकर्त्या राज्यभरातून उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 NOV 2018
तरुण भारत

# बीएएमएस डॉक्टरांसाठी पंचकर्म निष्णात अभ्यासक्रम

कोल्हापूर : येथील वनौषधी विद्यापीठ संस्थेच्यावतीने



शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्राच्या ॲडव्हान्स सर्टीफिकेट कोर्स इन पंचकर्म हा एक वर्ष मुदतीचा अभ्यासक्रम सुरू झाला असून, बीएएमएस आयुर्वेदाचार्य पदवीधारक या अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ शकतात. दर शनिवार, रविवारी सुट्टी दिवशी थेअरी आणि प्रात्यक्षिकांसह या अभ्यासक्रमाचे वर्ग आयुर्वेद पंचकर्म सेंटर, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथे होणार असून, आयुर्वेद डॉक्टरांना आत्मविश्वसाने पंचकर्म निष्णात होण्यासाठी या अभ्यासक्रमाचा लाभ होणार आहे. प्रवेश संख्या मर्यादित असल्याने प्रवेशासाठी आणि अधिक माहितीसाठी डॉ. सुनील बी. पाटील, आयुर्वेदाचार्य, आयुर्वेद पंचकर्म सेंटर, सत्यवादी प्रेस शेजारी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेतर्फे पत्रकाद्वारे कळवले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात २६ पासून 'कबड्डी'चा आवाज

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा : विविध ६८ विद्यापीठांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा (पुरुष गट) दि. २६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान होणार आहेत. त्यामध्ये पश्चिम विभागातील ६८ विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहेत. विद्यापीठाला या स्पर्धेचे तिसऱ्यांदा यजमानपद मिळाले आहे.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे (एआययू) या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीच्या स्पर्धेचे यजमानपद 'एआययू' कडून शिवाजी विद्यापीठाला मिळाले आहे. यापूर्वी विद्यापीठाला दोनवेळा या स्पर्धेचे यजमानपद मिळाले आहे. यावर्षीच्या स्पर्धेची सुरुवात सोमवार (दि. २६ नोव्हेंबर) पासून होणार आहे.

विद्यापीठातील लोककला केंद्रात स्पर्धा होणार आहेत. त्यामध्ये यजमान शिवाजी विद्यापीठासह मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर, अजमेर, ग्वाल्हेर, रोहतक, जबलपूर, आदी ६८ विद्यापीठांच्या संघातून एकूण १०२० खेळाडू सहभागी होतील. त्यामध्ये प्रो-कबड्डीमध्ये खेळणारश कबड्डीपटूदेखील असणार आहेत. शुक्रवारी (दि. ३० नोव्हेंबर) स्पर्धेचा समारोप होईल.

### अशी होणार स्पर्धा

**सकाळी सात ते दुपारी १२ आणि दुपारी चार ते रात्री आठ या वेळेत स्पर्धेतील सामने होणार आहेत. बाद फेरीनंतर साखळी फेरीतील सामने होतील. रोज २४ सामने होणार आहेत.**

### विविध समित्यांद्वारे तयारी सुरू

**विविध समित्यांच्या माध्यमातून या पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धेची विद्यापीठात तयारी सुरू असल्याचे क्रीडा विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी सांगितले. ते म्हणाले, स्पर्धेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. या स्पर्धेतून चार संघांची निवड ही अखिल भारतीय स्पर्धेसाठी होणार आहे.**

